## डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली



# किमान कौशल्यावर आधारित कृषि अभ्यासक्रम




## माहिती पुस्तिका

www.dbskkv.org

# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

दापोली-४१५ ७१२, जि. रत्नागिरी

# किमान कौशल्यावर आधारित कृषि अभ्यासक्रम

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रशिक्षणाचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | कलम निर्मिती | २ |
| २. | शोभिवंत झाडांची निर्मिती | ३ |
| ३. | पुष्परचना व बोन्साय | ३ |
| ४. | भाजीपाला रोपवाटिका | ४ |
| ५. | हरीतगृहातील शेती | ४ |
| ६. | गांडुळ खत निर्मिती | ५ |
| ७. | अळिंबी उत्पादन | ५ |
| ८. | कुक्कुटपालन | ६ |
| ९. | शेळी व मेंढी संगोपन | ६ |
| १०. | दुग्धजन्य पदार्थ निर्मिती | ७ |
| ११. | फळ प्रक्रिया | ७ |
| १२. | नारळ प्रक्रिया | ८ |
| १३. | काजू बी प्रक्रिया | ८ |
| १४. | बेकरी उत्पादने | ९ |
| १५. | कृषि अवजारांची देखभाल व दुरूस्ती | ९ |
| १६. | गोडया पाण्यातील मत्स्य संवर्धन | १० |
| १७. | शोभिवंत माशांचे उत्पादन व मत्स्यालय व्यवस्थापन | १० |
| १८. | मूल्यवर्धित मत्स्यपदार्थ निर्मिती | ११ |



**संकलन व संपादन :** **डॉ. प्रमोद सावंत**, सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण)
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी



**प्रकाशक :** **डॉ. चंद्रमोहन भांबुरे**, अधिष्ठाता (कृषि) व शिक्षण संचालक
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी



डॉ. किसन लवांडे

# मनोगत

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा समजला जात आहे. आपल्या देशामध्ये सुमारे ४३ टक्के क्षेत्रावर शेती केली जाते आणि शेतीवर अवलंबून राहाणाऱ्या लोकांची संख्या ६७ टक्के आहे. म्हणूनच आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये अजूनही शेतीची मुख्य भूमिका आहे. स्वातंत्र्यानंतर औद्योगिक विकासावर जोर देण्यात आला. अर्थव्यवस्थेचा बराचसा भाग मुलभूत सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी वळविण्यात आला. उद्देश हा होता की शेतीवरील मनुष्याचा बोजा कमी होईल तसेच औद्योगिक रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध होतील. परंतु त्या क्षेत्राने केवळ १० ते १५ टक्के लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. काही मुलभूत सुविधा शेतीच्या वाटयाला आल्या असत्या तर ग्रामीण रोजगारात वाढ झाली असती. ज्या धंद्यावर मोठी लोकसंख्या अवलंबून आहे, त्यासाठी मात्र कुशल मनुष्यबळ उपलब्ध नाही.

कृषि क्षेत्रात असे अनेक विषय आहेत की ज्यामध्ये १ ते २ आठवडयाचे प्रशिक्षण दिले तर प्रशिक्षणार्थीचे प्राविण्य वाढेल व हा वर्ग स्वयंरोजगाराव्यतिरिक्त शेतकऱ्यांच्या मदतीसही उपलब्ध होऊ शकेल. याच उद्देशाने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने किमान कौशल्यावर आधारित कृषि अभ्यासक्रम राबविण्याचे धोरण स्वीकारले आहे. यामध्ये विद्यापीठाने १८ अभ्यासक्रम तयार केले आहेत व ते जानेवारी २०१३ पासून कार्यान्वित होणार आहेत. या अभ्यासक्रमांमधून प्रशिक्षणार्थींमध्ये नवीन कौशल्य विकसित होऊन त्यांना रोजगाराच्या किंवा व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार असून त्यांच्या आर्थिक क्षमतेत सुधारणा होण्यास मदत होणार आहे. या प्रशिक्षणात भाग घेणाऱ्या सर्व प्रशिक्षणर्थींना व्यावसायिक पध्दतीने प्रशिक्षण देण्यात येणार असून त्यातून ते स्वतःला तसेच कुटुंबाला मदत करू शकतील आणि त्यातूनच पुढे स्थानिक पातळीवरील अर्थव्यवस्थाही बळकट होण्यास मदत होईल. या कार्यक्रमाची आणखी काही वैशिष्ट्ये म्हणजे प्रात्यक्षिकासह कौशल्य विकास, प्रशिक्षण कार्यक्रमात तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रशिक्षणार्थींना अद्ययावत व सुसज्ज प्रयोगशाळेत/प्रक्षेत्रावर प्रशिक्षण घेण्याची संधी, कार्यक्रमांतर्गत यशस्वी उद्योजकांबरोबर चर्चा करण्याची संधी, प्रकल्प अहवाल तयार करण्यास उपयुक्त आणि प्रशिक्षण पूर्ण केल्यावर प्रशिक्षणार्थींचा आत्मविश्वासही वाढेल. हे अभ्यासक्रम शेतकरी, शेतकरी महिला व बेरोजगार तरूण यांच्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरतील असा मला आत्मविश्वास आहे. या अभ्यासक्रमांचा वरील घटकांनी अवश्य लाभ घ्यावा, असे मी आवाहन करतो.

**(किसन लवांडे)**
कुलगुरु
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ
दापोली, जि. रत्नागिरी

# किमान कौशल्यावर आधारित कृषि अभ्यासक्रम

आपल्या देशामध्ये शेतीवर अवलंबून राहाणाऱ्या लोकांची संख्या ६७ टक्के आहे. आपला देश शेती प्रधान देश म्हणून ओळखला जातो व देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये शेती व्यवसायाचे स्थानही महत्वाचे राहीले आहे. आपला देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनला तो देशात घडलेल्या हरित क्रांतीमुळे. या हरित क्रांतीमध्ये प्रशिक्षित मनुष्यबळ हा एक मुख्य घटक होता.

शेती ही फक्त उदरनिर्वाहाचे साधन न होता ती व्यावसायिक पध्दतीने होण्याची गरज आहे. यासाठी शेतकऱ्यांनी सुधारित तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करणे अत्यंत गरजेचे आहे. कृषि विद्यापीठांमध्ये नवनवीन प्रकारचे शेती विषयक संशोधन होत आहे, त्यातून शेतकऱ्याला उपयोगी तंत्रज्ञानाची शिफारस केली जाते. हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी शेतात वापरल्यास त्यांच्या उत्पन्नात भर पडेल. यासाठी शेतकऱ्यांनी शेती विषयक नवीन ज्ञान व कौशल्य आत्मसात करून त्याचा शेती मध्ये वापर करणे गरजेचे आहे.

शेतीमध्ये नवनवीन तंत्रज्ञान वापरताना त्यातील कौशल्ये आत्मसात केल्याने यातून शेतकऱ्यांचे श्रम वाचतात, कार्यक्षमता वाढते, तसेच वेळ व पैशाचीही बचत होते. शेती विषयक कौशल्ये आत्मसात केल्याने शेतकरी, तरूण, स्त्रिया हे शेती व शेतीशी संबंधित विषयाशी निगडीत स्वत:चा उद्योग करू शकतात. याच उद्देशाने डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाने किमान कौशल्यावर आधारित कृषि अभ्यासक्रम राबविण्याचे धोरण स्वीकारले आहे. हे अभ्यासक्रम शेतकरी, तरूण, शेतकरी महिला यांच्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. या अभ्यासक्रमांची माहिती या ठिकाणी देण्यात येत आहे.

### वैशिष्ट्ये

- प्रात्यक्षिकासह कौशल्य विकास
- तज्ज्ञांचे मार्गदर्शन
- अद्ययावत व सुसज्ज प्रयोगशाळेत/प्रक्षेत्रावर प्रशिक्षण
- उद्योग किंवा सेवा क्षेत्र सुरु करण्याची संधी.
- यशस्वी उद्योगांना भेटी
- प्रकल्प अहवाल तयार करण्यास उपयुक्त
- आत्मविश्वास वाढेल

## १. कलम निर्मिती

- झाडांची अभिवृध्दी व त्याचे प्रकार अभ्यासणे.
- कलमे बांधणे खुंट रोपे तयार करणे व खुंट रोपांची निवड.
- डोळा काडीची निवड करणे वाहतूक व साठवणीत घ्यावयाची काळजी.
- विविध माध्यमांचा अभ्यास, माध्यम तयार करणे (पॉटिंग मिश्रण) प्लॅस्टीक पिशव्या भरणे.
- तयार केलेली कलमे पिशव्यांमध्ये भरून पॉलीशेड मध्ये ठेवणे.
- तयार कलमांची जोपासना : पाणी व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, रोग व कीड व्यवस्थापन, मुळखोडावरील फुटवा काढणे, संजिवकांचा वापर.
- रोपे/कलमे रिबॅगिंग करणे.
- कलमांची/रोपांची सर्व साधारण काळजी.
- डोळा बांधणीच्या विविध पध्दती, गुटी कलमांच्या विविध पध्दती.
- रोपवाटिके संबधित सर्व नोंदवहया व नोंदी ठेवणे.
- प्रकल्प अहवाल बनविणे.
- रोपवाटिके संबंधित शासकीय योजना.
- विविध रोपवाटिकांना भेट.





**प्रशिक्षण कालावधी :** ५ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## २. शोभिवंत झाडांची निर्मिती



- बागेत वापरावयाच्या हत्यारांची ओळख व त्यांचे प्रकार.
- बागेची आखणी व मांडणी.
- शोभिवंत झाडांची अभिवृध्दी व त्यांचे प्रकार.
- गादीवाफे तयार करणे व पिशव्यांमध्ये परस्पर लावणी /पेरणी.
- पॉटिंग मिश्रण (माध्यम) तयार करणे, प्लॅस्टीक पिशवीत पॉटिंग मिश्रण भरणे, गुलाब मुळकांड तयार करणे, कलम बांधणीसाठी प्लॅस्टीक पट्टी तयार करणे, गुलाब कलम बांधणे, बांधलेले कलम प्लॅस्टीक पिशवीत भरणे, बांधलेली कलम पॉलीशेड मध्ये ठेवण्यासाठी पॉली शेड तयार करणे, पॉलीशेड मध्ये बांधलेली कलमे नीट लावणे व कलमांना पाणी देणे, बुरशीनाशकाची जिरवणी करणे, मुळ खोडावर आलेला फुटवा वेळोवेळी काढणे आणि रोपवाटीकेचे व्यवस्थापन.
- अर्थशास्त्र व प्रकल्प अहवाल.
- प्रक्षेत्रावरील विविध शोभिवंत झाडांच्या रोपवाटिकांना भेट.





**प्रशिक्षण कालावधी :** ५ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## ३. पुष्परचना व बोन्साय

**पुष्परचना :-**

- पुष्परचनेचे महत्व, पुष्परचनेचा पसारा.
- पुष्परचनेची विविध तत्वे : लक्षवेधीपणा, समतोल, संतुलीतपणा, सुसंगती, एकत्रितपणा.
- पुष्परचनेचे प्रकार.
- पुष्परचना मांडणीसाठी फ्लॉवर पॉट/मांडणी साहित्य, पीटमॉस, होल्डर, चिकणमाती इत्यादींची निवड.
- पुष्परचनेसाठी पाने, फुले, फळे यांची निवड व मांडणी.
- विविध प्रकारचे हार, गुच्छ,बुके.





**बोन्साय :-**

- बोन्साय तयार करण्याच्या विविध पध्दती.
- बोन्सायसाठी झाडांची व पॉटची निवड.
- बोन्सायसाठी माध्यमांची निवड.
- बोन्सायचे दैनंदिन व्यवस्थापन.
- अर्थशास्त्र व प्रकल्प अहवाल.

**प्रशिक्षण कालावधी :** २ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## ४. भाजीपाला रोपवाटिका

- पॉलीहाऊसमध्ये रोपे तयार करणे.
- रोपवाटिकेसाठी जागा, जागेची नांगरट, कुळवणी, मातीत खते मिसळणे, गादीवाफे तयार करणे.
- विविध भाजीपाला पिकांच्या जातींच्या बियाण्याची निवड, खरेदी व प्रक्रिया.
- गादीवाफ्यावर बीज प्रक्रिया करून बियाण्याची पेरणी करणे, बियाण्यावर आच्छादन घालणे.
- कीड-मुंगीचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून कीटकनाशकांचा वापर.
- अंकुरण झाल्यानंतर गादीवाफ्यावर टाकलेले आच्छादन बाजूला करणे, तण काढणे, खतांची मात्रा देणे.
- रोपे काढणी व विक्री.
- अर्थशास्त्र व प्रकल्प अहवाल.






**प्रशिक्षण कालावधी :** ४ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## ५. हरीतगृहातील शेती

- हरीतगृह म्हणजे काय? हरीतगृहाचे फायदे.
- हरीतगृहांचे प्रकार.
- हरीतगृहातील पिकांकरीता माध्यमांची निवड, माध्यमांचे निर्जतुकीकरण.
- हरीतगृहातील पाणी व खत व्यवस्थापन.
- हरीतगृहातील फुलशेती - जर्बेरा, कार्नेशन, गुलाब, ऑर्कीड, ॲन्थुरीयम, लिलियम.
- हरीतगृहातील भाजीपाला - भोपळी मिरची, टोमॅटो, काकडी, झुकिणी इत्यादी, परदेशी भाज्या.
- हरीतगृहातील रोपे निर्मितीच्या आधुनिक पध्दती.
- हरीतगृहातील वातावरण नियंत्रणाचे महत्व व वातावरण नियंत्रणाचे घटक.
- हरीतगृहाची निगा.
- अर्थशास्त्र, प्रकल्प अहवाल व शासकीय योजना.





**प्रशिक्षण कालावधी :** ७ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. १,५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## ६. गांडूळखत निर्मिती





- सेंद्रिय शेती, व्याप्ती, महत्त्व, फायदे.
- सेंद्रिय खते : प्रकार व तयार करण्याच्या पध्दती.
- गांडूळाचे कार्य, शरीर रचना, जीवनक्रम, प्रजाती, खाद्य.
- गांडूळ व गांडूळ खत निर्मिती : पध्दत व फायदे.
- गांडूळ पाणी निर्मिती : पध्दत व फायदे.
- गांडूळ खत व गांडूळ पाणी घटक तपासणी पध्दती, तयार खत कसे ओळखावे ?
- गांडूळ खत निर्मिती : प्रकल्पास भेट.
- गांडूळ खत निर्मिती : अर्थशास्त्र, नोंद वही.
- प्रकल्प अहवाल व शासकीय योजना.

**प्रशिक्षण कालावधी** : ४ दिवस

**प्रशिक्षण शुल्क** : रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## ७. अळंबी उत्पादन





- अळंबी उत्पादन - एक फायदेशीर जोडधंदा.
- अळंबीची शरीररचना.
- अळंबीचे आहारातील महत्व आणि औषधी गुणधर्म.
- भाताच्या पेंढयावर वाढणाऱ्या अळंबीची लागवड.
- अळंबीवरील रोग आणि किडी व त्यांचे नियंत्रण.
- अळंबी बीज बनविण्याची पध्दत व दर्जेदार बियाणे ओळखण्याचे निकष.
- धिंगरी अळंबीची लागवड.
- अळंबी गृहामध्ये तापमान व आर्द्रता राखण्यासाठीची उपाययोजना.
- अळंबी गृहामध्ये स्वच्छतेचे महत्व आणि त्यासाठी करावयाची उपाययोजना.
- अळंबी काढणी आणि विक्री.
- अळंबी पासून प्रक्रियायुक्त पदार्थ.
- अर्थशास्त्र व प्रकल्प अहवाल.

**प्रशिक्षण कालावधी** : ४ दिवस

**प्रशिक्षण शुल्क** : रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## ८. कुक्कुटपालन





- कोंबडी व्यवसायासाठी व घरासाठी जागेची निवड.
- विविध जातींच्या पक्षांचे निरीक्षण, ओळख व वर्गीकरण.
- कोंबडयांची घरे, आवारे, कोंबडयांच्या घरांची स्वच्छता.
- कोंबडयांच्या पैदास पध्दती, कोंबडीपिल्लांची उपलब्धता, अंडी उबवणूक.
- कुक्कुटपालन व्यवसायाकरीता लागणारी साधने व उपकरणे.
- पिल्लांची खरेदी, पूर्वतयारी व कृत्रिम दायी, ब्रुडरची व्यवस्था, खाद्य पाणी व्यवस्था.
- तलंगांचे व पूर्ण वाढ झालेल्या पक्षांचे निरीक्षण, ओळख.
- पक्षांचे हंगामानुसार संगोपन.
- पक्षी सांभाळण्याच्या प्रमुख पध्दती - गादी व पिंजरा पध्दत.
- अंडयातील घटक व पोषणमूल्ये, सफल व असफल अंडी, शिळे व ताजे अंडे, अंड्याची हाताळणी, प्रतवारी.
- कोंबडी खाद्याचे प्रकार व वय परत्वे खाद्य.
- मांसल कोंबडयांचे हंगामानुसार संगोपन व पक्षांचे व्यवस्थापन.
- कोंबडयांचे महत्वाचे विविध रोग, लक्षणे, उपचार व काळजी.
- पक्षांचे निरीक्षण, पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्याने औषधोपचार.
- कोंबडयांचे लसीकरण व त्याचे महत्त्व.
- यंत्राच्या साहाय्याने कोंबडयांच्या चोची कापणे, यंत्राची देखभाल.
- अर्थशास्त्र, प्रकल्प अहवाल व व्यवसायाच्या नोंदी.

**प्रशिक्षण कालावधी** : ५ दिवस **प्रशिक्षण शुल्क** : रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## ९. शेळी व मेंढी संगोपन





- जागेची निवड, गोठा बांधणी, गोठा रचना, साठया बांधणे, परीसर साफसफाई.
- गोठयाचे व्यवस्थापन, साहित्याची जमवाजमव, मांडणी, गोठा व पॅडॉक स्वच्छता.
- विविध जाती, उपलब्धता कोकणासाठी उपयुक्त जाती, गोठयामधील जातींची ओळख, निरीक्षण, वयानुसार वर्गवारी, करडांचे संगोपन, दूध पाजणे.
- शेळया मेंढयामधील प्रजनन, गाभण शेळया-मेंढयांचे संगोपन.
- सुधारीत चारा पिके व झाडपाला पिके आणि त्यांची लागवड, कापणी व साठवण.
- महत्वाचे रोग, लक्षणे व उपचार, औषधोपचार, परजीवी प्रतिबंधक उपाययोजना.
- शेळया-मेंढयांना वेळापत्रकानुसार लसीकरण.
- अर्थशास्त्र, प्रकल्प अहवाल, व्यवसायाच्या नोंदी व शासकीय योजना.

**प्रशिक्षण कालावधी** : ५ दिवस **प्रशिक्षण शुल्क** : रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## १०. दुग्धजन्य पदार्थ निर्मिती



- दुग्धजन्य पदार्थ व त्यांचे वर्गीकरण.
- पूर्वतयारी : गाय-म्हैस दूध, दुधाची तपासणी, दुधाची वर्गवारी, प्रतवारी, दुध तापविणे, विरजण लावणे इत्यादी, पदार्थाबाबत विश्लेषण आणि प्रात्यक्षिक.
- पदार्थ निर्मिती : दही, चक्का, विविध स्वादाचे श्रीखंड, लस्सी, सुगंधी ताक, छन्ना, पनीर आंबा रसगुल्ला, छन्ना पोडो, मिल्क केक, खवा, आंबा रबडी, विविध स्वादांची बर्फी, गुलाबजामून, आईस्क्रिम/कुल्फी.
- पदार्थ निर्मितीचे अर्थशास्त्र.
- प्रकल्प अहवाल, पदार्थ निर्मितीच्या नोंदी.
- शासकीय योजना.



**प्रशिक्षण कालावधी :** ५ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. १,०००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## ११. फळ प्रक्रिया



- फळे व भाज्यांची पोषकता व त्यांचे महत्त्व.
- प्रक्रिया विभाग उभारणीकरीता आवश्यक साधनसामुग्री.
- प्रक्रियेकरीता लागणारी यंत्रे, साहित्ये व त्यांची हाताळणी.
- एकूण विद्राव्य घटक व आम्लता तसेच त्यांचे गुणोत्तर.
- फळांचा गर डब्यात हवाबंद करणे.
- फळांवर आधारीत विविध पेये (आरटीएस, स्क्रॅश व सिरप) व फळांचा गर.
- फळांपासून जॅम, जेली व मार्मलेड.
- फळांपासून मुरंबा, कॅन्डी व साखरेच्या पाकातल्या फळांच्या फोडी.
- लोणचे व खारविलेले पदार्थ.
- फळांची चटणी.
- टोमॅटोचे विविध पदार्थ.
- फळे व भाजीपाला सुकविणे.
- प्रक्रिया उद्योगांना भेटी.
- अर्थशास्त्र व प्रकल्प अहवाल.




**प्रशिक्षण कालावधी :** ८ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. ३०००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## १२. नारळ प्रक्रिया

- नारळ प्रक्रिया व्यवसाय - महत्त्व.
- नारळ प्रक्रियेसाठी लागणारी मशिनरी.
- नारळाच्या चिप्स.
- ओल्या नारळापासून सुके खोबरे.
- नारळाच्या पाण्यापासून व्हिनेगार.
- नारळाच्या करवंटीपासून कोळसा.
- अर्थशास्त्र व प्रकल्प अहवाल.
- नारळ प्रक्रिया मशिनरी - ठिकाणे आणि पत्ते.






**प्रशिक्षण कालावधी :** ३ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## १३. काजू प्रक्रिया

- काजू बी प्रक्रिया - लागणारी यंत्रसामुग्री ओळख, काजूचे अर्थशास्त्र, लघुउद्योग.
- काजू बी वाळविणे, वाळवणी यंत्राचा वापर, देखभाल व दुरूस्ती.
- काजू बी प्रतवारी करणे.
- काजू बी वाफविणे व वाळविणे.
- काजू बी फोडणी व टरफले वेगळी करणे.
- काजू गर वाळविणे.
- काजू गर सोलणी व काजू गर प्रतवारी.
- काजू टरफल प्रक्रिया - महत्व व उपयोग.
- काजू बोंड प्रक्रिया.
- काजू गर पॅकिंग व साठवणूक.
- अर्थशास्त्र व प्रकल्प अहवाल.
- काजू बी प्रक्रिया मशिनरी - देखभाल व दुरुस्ती.
- काजू बी प्रक्रिया मशिनरी - ठिकाणे आणि पत्ते.





**प्रशिक्षण कालावधी :** ४ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. २,०००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## १४. बेकरी उत्पादने



- बेकरी व्यवसाय व त्याचे महत्त्व.
- बेकरी व्यवसायाकरिता लागणारा कच्चा माल.
- बेकरी मशिनरी.
- ब्रेड बनविण्याची कृती व प्रकार.
- बिस्कीट बनविण्याची कृती व प्रकार.
- नानकटाई बनविण्याची कृती व प्रकार.
- खारी बनविण्याची कृती व घ्यावयाची काळजी.
- केक बनविण्याची कृती व प्रकार.
- बेकरी व्यवसाय - प्रकल्प अहवाल व अर्थशास्त्र.
- बेकरी मशिनरी - ठिकाणे आणि पत्ते.



**प्रशिक्षण कालावधी :** ५ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. ३,०००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## १५. कृषि अवजारांची देखभाल व दुरुस्ती



- कृषि अवजारे व यांत्रिकीकरणाचे महत्व, विविध शक्ती स्त्रोत उपयोग.
- ट्रॅक्टर व पावर टिलरच्या विविध प्रणालींचा अभ्यास.
- इंजिन प्रणाली मधील बिघाड व दुरुस्ती.
- ट्रॅक्टर व पावर टिलरची देखभाल व सर्व्हिसिंग.
- ट्रॅक्टर व पावर टिलरचलित विविध यंत्रे औजारांचा अभ्यास.
- स्वयंचलित, बैलचलित व मानवचलित विविध कृषि यंत्रांचा वापर.
- विविध फवारणी यंत्रांची व शेतीउपयोगी अवजारांची देखभाल व दुरुस्ती.
- ट्रॅक्टर व पावर टिलर विविध कंट्रोलचा परिचय व हाताळणी.
- ट्रॅक्टर व पावर टिलरचलित यंत्रांच्या अधिक कार्यक्षम वापरासाठी अवजारांचे सेटींग, हाताळणी.
- कृषि अवजारे पार्कला भेट, यंत्रांची उपयोगिता.
- अर्थशास्त्र व प्रकल्प अहवाल.



**प्रशिक्षण कालावधी :** ४ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. ५००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## १६. गोड्या पाण्यातील मत्स्य संवर्धन





- संवर्धन योग्य माशांच्या जातीची ओळख.
- संवर्धन प्रकल्पासाठी जागेची निवड, जल परीक्षण व माती परीक्षण.
- संवर्धनाच्या विविध पध्दती.
- तलावांची रचना आणि बांधकाम, संवर्धनासाठी तलावाची पूर्वतयारी : पाणवनस्पती, भक्षक व उपद्रवी मासे निर्मूलन.
- बीज संचयन पूर्व खतांची मात्रा ठरविणे आणि वापर.
- पाण कीटकांची ओळख व निर्मूलन.
- बिजांच्या विविध अवस्थांची ओळख, निवड वाहतूक व हाताळणी, बीज संचयन.
- संचयन पश्चात तलावांचे जल व्यवस्थापन.
- प्लवंगाचे पृथक्करण व तलावाची उत्पादकता तपासणे.
- एकात्मिक मत्स्य संवर्धन.
- गोडया पाण्यातील कोळंबी संवर्धन.
- संचयन पश्चात खतांचा वापर.
- खाद्य व्यवस्थापन, खाद्य तयार करणे.
- माशांचे रोग व उपाय.
- काढणी व विक्री व्यवस्थापन, काढणी पश्चात हाताळणी.
- अर्थशास्त्र, प्रकल्प अहवाल व प्रक्षेत्र भेट.

**प्रशिक्षण कालावधी :** ६ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. २,०००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## १७. शोभिवंत माशांचे उत्पादन आणि मत्स्यालय व्यवस्थापन



- शोभिवंत माशांच्या विविध जाती व त्याची निवड.
- मत्स्यालयाचे विविध प्रकार, बांधणी.
- मत्स्यालयातील विविध उपकरणे व सजावट.
- मत्स्यालय मांडणी व व्यवस्थापन.
- जल व्यवस्थापन पाणी बदल, गाळण यंत्रणा, संवर्धन योग्य दर्जा.
- पिल्ले देणाऱ्या माशांचे प्रजनन.
- गोल्ड फिश आणि कोई माशांचे प्रजनन व संवर्धन.
- पाणवनस्पतीचे प्रकार व संवर्धन.
- जिवंत मत्स्य खाद्यः टयुबीफेक्स, कायरोनोमीड व गांडूळ संवर्धन.
- कृत्रिम खाद्य आणि व्यवस्थापन.
- टेट्रा, बार्ब आणि डॅनिओ माशांचे प्रजनन व संवर्धन.
- कृत्रिम खाद्य तयार करणे.
- शोभिवंत मत्स्य संवर्धनाच्या विविध पध्दती.
- जिवंत मत्स्य खाद्य डॅनीया, मोयना, इन्यूसोरीया संवर्धन.
- सिक्लीड व ॲनाबॅटीड माशांचे प्रजनन व संवर्धन.
- शोभिवंत मासे बिजोत्पादन केंद्र, आखणी व बांधणी.
- सागरी मत्स्यालय मासे व व्यवस्थापन.
- माशांची वाहतूक, अनुकुलन निर्जतुकीकरण.
- शोभिवंत माशांचे मुख्य रोग व उपाययोजना.
- शोभिवंत मत्स्यपालन व्यवसाय व्यवस्थापन.
- आर्टीमिया सिस्ट हॅचिंग व संवर्धन.
- शोभिवंत मत्स्य व्यवसायः शासकीय योजना.
- अर्थशास्त्र व प्रकल्प अहवाल.

**प्रशिक्षण कालावधी :** ६ दिवस

**प्रशिक्षण शुल्क :** रु. २,०००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## १८. मूल्यवर्धित मत्स्य पदार्थ निर्मिती

- कच्चा माल व घटक पदार्थांची निवड.
- मत्स्य खिमा आणि मत्स्य सुरुमी.
- इमलशन प्रकारचे मत्स्य पदार्थ तयार करण्याच्या पध्दती.
- आमटीतील मत्स्य गोळयासाठी आमटी.
- पदार्थाची गुणवत्ता चाचणी.
- आमटीतील मत्स्य गोळे व मत्स्य सँन्डविच.
- इमलशन प्रकारच्या पदार्थांची साठवणूक.
- मत्स्य चिकुवा, मत्स्य वडा बनविण्याची पध्दती.
- पांरपारिक मत्स्य पदार्थ तयार करण्याच्या पध्दती.
- परंपारिक पदार्थांची गुणवत्ता चाचणी.
- मत्स्य ब्रेड पदार्थ.
- पांरपारिक मत्स्य पदार्थांची साठवणूक.
- मत्स्य चकली व मत्स्य शेव.
- कोळंबी व कालवाचे लोणचे तयार करण्याच्या पध्दती.
- कोळंबी व कालवाच्या लोणच्याची गुणवत्ता चाचणी.
- मत्स्य वेफर्स व जवळा चटणी करण्याच्या पध्दती.
- कायटीन, कायटोसन बनविण्याच्या पध्दती.
- जिलेटीन व सिलेज बनविण्याच्या पध्दती.





- कायटीन व कायटोसन, जिलेटीन व सिलेजची गुणवत्ता चाचणी.
- मत्स्य प्रक्रिया उद्योगांना भेट.
- अर्थशास्त्र व प्रकल्प अहवाल.

**प्रशिक्षण कालावधी** : ६ दिवस

**प्रशिक्षण शुल्क** : रु. २,०००/- प्रति प्रशिक्षणार्थी

## ❊ इच्छूक प्रशिक्षणार्थींसाठी सूचना ❊

- प्रशिक्षण शुल्कामध्ये राहाण्याचा व जेवण्याचा खर्च समाविष्ट नाही. हा खर्च प्रशिक्षणार्थिंनी स्वत: करावयाचा आहे.
- प्रशिक्षणाच्या ठिकाणी विद्यापीठाचे अतिथीगृह असल्यास त्याठिकाणी प्रशिक्षणार्थिंची राहाण्याची सोय त्यांच्या आगावू मागणी नुसार करण्यात येईल. अन्य ठिकाणी प्रशिक्षणार्थिंनी राहाण्याची सोय स्वत: करावयाची आहे.
- कमीत कमी दहा प्रशिक्षणार्थिंनी नोंदणी केल्यावरच प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येईल.
- प्रशिक्षण वर्गात सहभागी होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधावा. संपर्कासाठी पत्ता व दूरध्वनी क्रमांक पुढे देण्यात आले आहेत.
- प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थिंना प्रमाणपत्र देण्यात येईल.
- प्रशिक्षण शुल्क आगावू किंवा प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी नोंदणी करताना भरून प्रशिक्षणासाठी प्रवेश घेता येईल.
- प्रसंगानुरूप व मागणीनुसार प्रशिक्षण कार्यक्रमात बदल होऊ शकतो. अद्ययावत माहितीसाठी कृपया विद्यापीठाच्या संकेत स्थळाची पाहणी करावी. (www.dbskkv.org)

## * प्रशिक्षणासाठी संपर्क *

### १. कलम निर्मिती

प्रमुख, उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२१३०, २८२४१५, विस्तार-२१८)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी (०२३५१-२३०३६१)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, रोहा, जि. रायगड (०२१९४-२०३१०८)
सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग (०२३६६-२६२२३४)
प्रक्षेत्र संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२४०३२४)
प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. ठाणे (०२५२५-२४१०४८)

### २. शोभिवंत झाडांची निर्मिती

प्रमुख, उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२१३०, २८२४१५, विस्तार-२१८)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी (०२३५१-२३०३६१)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, रोहा, जि. रायगड (०२१९४-२०३१०८)
प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. ठाणे (०२५२५-२४१०४८)

### ३. पुष्परचना व बोन्साय

प्रमुख, उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२१३०, २८२४१५, विस्तार-२१८)
प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. ठाणे (०२५२५-२४१०४८)

### ४. भाजीपाला रोपवाटिका

प्रक्षेत्र संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२४०३२४)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी (०२३५१-२३०३६१)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, रोहा, जि. रायगड (०२१९४-२०३१०८)
प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. ठाणे (०२५२५-२४१०४८)

### ५. हरीतगृहातील शेती

प्रमुख, उद्यानविद्या विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२१३०, २८२४१५, विस्तार-२१८)

### ६. गांडूळखत निर्मिती

प्रमुख, कृषि रसायन व मृदशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२१३०,२८२४१५ विस्तार-२२१)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी (०२३५१-२३०३६१)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, रोहा, जि. रायगड (०२१९४-२०३१०८)

### ७. अळंबी उत्पादन

प्रमुख, वनस्पती रोगशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२१३०,२८२४१५, विस्तार-२२५)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी (०२३५१-२३०३६१)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, रोहा, जि. रायगड (०२१९४-२०३१०८)
सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड (०२१४८-२२२०३१)

### ८. कुक्कुटपालन

प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२१३०,२८२४१५, विस्तार-२१९)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी (०२३५१-२३०३६१)
कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, रोहा, जि. रायगड (०२१९४-२०३१०८)
अधिक्षक, पशुपैदास प्रक्षेत्र, निळेली, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग (०२३६२-२३८००६)

## ९. शेळी व मेंढी संगोपन

प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२१३०,२८२४१५, विस्तार-२१९)

कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, लांजा, जि. रत्नागिरी (०२३५१-२३०३६१)

कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, रोहा, जि. रायगड (०२१९४-२०३१०८)

अधिक्षक, पशुपैदास प्रक्षेत्र, निळेली, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग (०२३६२-२३८००६)

## १०. दुग्धजन्य पदार्थ निर्मिती

प्रमुख, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृषि महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२१३०,२८२४१५, विस्तार-२१९)

## ११. फळ प्रक्रिया

सहयोगी अधिष्ठाता, काढणी पश्चात व्यवस्थापन पदव्युत्तर संस्था, दापोली, जि.रत्नागिरी (०२३५८-२६७६१३)

सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग (०२३६६-२६२२३४)

## १२. नारळ प्रक्रिया

प्रमुख, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग, कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२४१४,२८२७२१)

## १३. काजू प्रक्रिया

प्रमुख, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग, कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२४१४,२८२७२१)

सहयोगी संशोधन संचालक, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले, जि. सिंधुदुर्ग (०२३६६-२६२२३४)

## १४. बेकरी उत्पादने

प्रमुख, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग, कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८२४१४,२८२७२१)

## १५. कृषि अवजारांची देखभाल व दुरुस्ती

प्रमुख, कृषि यंत्रे व शक्ती विभाग, कृषि अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय, दापोली, जि. रत्नागिरी (०२३५८-२८०४२१)

## १६. गोड्या पाण्यातील मत्स्य संवर्धन

खार जमीन शास्त्रज्ञ, खार जमीन संशोधन केंद्र, पनवेल, जि. रायगड (०२२-२७४५२७७५)

प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, मुळदे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग (०२३६२-२४४२३१)

## १७. शोभिवंत माशांचे उत्पादन आणि मत्स्यालय व्यवस्थापन

प्रमुख, मत्स्य संवर्धन विभाग, मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, ता. जि. रत्नागिरी (०२३५२-२३२२४१, विस्तार-२१५, २२५)

प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, मुळदे, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग (०२३६२-२४४२३१)

संशोधन अधिकारी, तारापोरेवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्र, बांद्रा, मुंबई (०२२-२६५१६८१६)

## १८. मूल्यवर्धित मत्स्य पदार्थ निर्मिती

प्रमुख, मत्स्य प्रक्रिया विभाग, मत्स्य महाविद्यालय, शिरगांव, ता. जि. रत्नागिरी (०२३५२-२३२२४१, विस्तार-२१४, २२३)

# * किमान कौशल्यावर आधारित कृषि अभ्यासक्रम *

| अ. क्र. | प्रशिक्षणाचा विषय | ठिकाण | प्रशिक्षणाचा कालावधी (दिवस व महिना) | प्रशिक्षणार्थींची संख्या | प्रशिक्षण शुल्क (प्रति प्रशिक्षणार्थी) |
|---|---|---|---|---|---|
| १. | कलम निर्मिती | दापोली, लांजा, रोहा, वेंगुर्ले, वाकवली, पालघर | ५ (जून, जुलै) | २० | रु. ५००/- |
| २. | शोभिवंत झाडांची निर्मिती | दापोली, लांजा, रोहा, पालघर | ५ (डिसेंबर) | २० | रु. ५००/- |
| ३. | पुष्परचना व बोन्साय | दापोली, पालघर | २ (डिसेंबर) | २० | रु. ५००/- |
| ४. | भाजीपाला रोपवाटिका | वाकवली, लांजा, रोहा, पालघर | ४ (नोव्हेंबर) | २० | रु. ५००/- |
| ५. | हरीतगृहातील शेती | दापोली | ७ (जानेवारी) | २० | रु. १,५००/- |
| ६. | गांडुळ खत निर्मिती | दापोली, लांजा, रोहा | ४ (जानेवारी) | २० | रु. ५००/- |
| ७. | अळंबी उत्पादन | दापोली, लांजा, रोहा, कर्जत | ४ (जानेवारी) | २० | रु. ५००/- |
| ८. | कुक्कुटपालन | दापोली, लांजा, रोहा, निळेली | ५ (डिसेंबर) | २० | रु. ५००/- |
| ९. | शेळी व मेंढी संगोपन | दापोली, लांजा, रोहा, निळेली | ५ (फेब्रुवारी) | २० | रु. ५००/- |
| १०. | दुग्धजन्य पदार्थ निर्मिती | दापोली | ५ (जानेवारी) | २० | रु. १,०००/- |
| ११. | फळ प्रक्रिया | दापोली, वेंगुर्ले | ८ (मे, जून) | २० | रु. ३,०००/- |
| १२. | नारळ प्रक्रिया | दापोली | ३ (फेब्रुवारी, डिसेंबर) | २० | रु. ५००/- |
| १३. | काजू बी प्रक्रिया | दापोली, वेंगुर्ले | ४ (मार्च, एप्रिल) | २० | रु. २,०००/- |
| १४. | बेकरी उत्पादने | दापोली | ५ (जानेवारी) | १५ | रु. ३,०००/- |
| १५. | कृषि अवजारांची देखभाल व दुरूस्ती | दापोली | ४ (डिसेंबर) | २० | रु. ५००/- |
| १६. | गोडया पाण्यातील मत्स्य संवर्धन | पनवेल, मुळदे | ६ (ऑगस्ट, ऑक्टोबर) | २० | रु. २,०००/- |
| १७. | शोभिवंत माशांचे उत्पादन व मत्स्यालय व्यवस्थापन | रत्नागिरी, मुंबई, मुळदे | ६ (जानेवारी, मार्च) | २० | रु. २,०००/- |
| १८. | मूल्यवर्धित मत्स्यपदार्थ निर्मिती | रत्नागिरी | ६ (जानेवारी, सप्टेंबर) | २० | रु. २,०००/- |

टीप : अद्ययावत माहितीसाठी कृपया संकेतस्थळाची पाहणी करा (www.dbskkv.org)


* अधिक माहितीसाठी *

**सहयोगी अधिष्ठाता (निम्नस्तर कृषि शिक्षण)**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली-४१५७१२, जि.रत्नागिरी, दूरध्वनी : ०२३५८-२८२४११/१२/१३ (विस्तार-१२२)